सकाळ
पुणे, सोमवार,
८ जानेवारी २०१८




पं. जवाहरलाल नेहरू सभागृह : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातर्फे आयोजित 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना स. प. महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व प्राचार्य दिलीप शेठ. समवेत अतुल किर्लोस्कर, आरती किर्लोस्कर.

# 'ग्रीन कॉलेज'मध्ये 'स. प.' अव्वल

**पुणे, ता. ७ :** किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातर्फे घेण्यात आलेल्या 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धेत स. प. महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवित 'जीसीसीसी ट्रॉफी'वर आपले नाव कोरले. द्वितीय क्रमांक खडकीच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयास, तर तृतीय क्रमांक भानुबेन नानावटी व फर्ग्युसन महाविद्यालयाला विभागून देण्यात आला.

घोले रस्त्यावरील पं. जवाहरलाल नेहरू सभागृहात या स्पर्धेचे पुरस्कार वितरण झाले. उद्योजक अतुल किर्लोस्कर, स्पर्धेच्या निमंत्रक आरती किर्लोस्कर, महोत्सवाचे अध्यक्ष माधव चंद्रचूड, संयोजक वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते.

स्पर्धेत 'कॉन्सुलेशन प्राइज' डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयास मिळाले. सहभागासाठी सिंबायोसिस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मणिलाल नानावटी व्होकेशनल स्टडीज फॉर वुमेन, भारती विद्यापीठ पर्यावरण विभाग व इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस यांना सन्मानपत्र देण्यात आले.

स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप शेठ म्हणाले, 'आमच्या शैक्षणिक संस्थेने 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज, डिजिटल कॉलेज' संकल्पना काही वर्षांपूर्वीपासूनच राबवीत आहे. विशेषतः प्लॅस्टिक बंदी, निर्मूलन आणि त्याविषयीच्या जागृतीवर भर दिला आहे.

महाविद्यालय, कॅन्टीन, खानावळ आणि वसतिगृहाच्या परिसरातील ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण केले. बायोगॅस प्रकल्प राबविला. वृक्षारोपण करण्यास प्राधान्य दिले. या उपक्रमामुळेच महाविद्यालयाचा हा गौरव होऊ शकला.'' सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.